जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

**प्रेसनोट क्रमांक - ४५३ दिनांक - ०४/११/२०२४**

वाघोली पोलीस स्टेशन,

**कॉपर वायर चोरणारी टोळी जेरबंद एकुण १३,४४,८१७/- रू. चा मुद्देमाल जप्त.**

वाघोली पोलीस स्टेशन, गु.र.नं.१०२२/२०२४, भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ३०३(२), ३३४(२), ३(५) अन्वये दाखल गुन्हयातील फिर्यादी कामास असलेल्या कंपनीमधून १७,५१,२७५/- रू.किंमतीचे तांब्याच्या ताराचे विविध कंपनीचे ७३ बंडल चोरी झाले बाबत लोणीकंद पोलीस ठाणेस गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयाचा तपास चालू असताना पंडीत रेजितवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाघोली पोलीस स्टेशन, यांनी गुन्हे शोध पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिरीष भालेराव, व स्टाफ यांना गोपनीय माहीती काढण्याच्या व सी.सी.टी.व्हि.कॅमेरे चेक करण्याच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे त्यांनी सी.सी.टी.व्हि. कॅमेरे चेक करून एक ट्रान्सपोर्ट कंपनीची पिकअप असल्याचे निष्पन्न केले त्या अनुषंगाने कंपनीकडे विचारपूस करून गाडीचा नंबर निष्पन्न केला. सदर गाडीबाबत गोपनीय माहीती काढून गुन्हयात वापरलेले पिकअप वाहन चालक नामे **१) जमाल अब्दुल रहमान, वय ५३ वर्षे, रा. फ्लॅटनं २०१, जॅस्मीन रेसीडेंन्सी, लेननं ७, सातवनगर, हडपसर, पुणे** याचेसह हांडेवाडी पुणे येथून ताब्यात घेवून चालकाकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास केला असता त्याने सदर गुन्हा इसम नामे **२) अनिल रिखीराम गुप्ता, वय ३७ वर्षे, रा.लक्ष्मी माता मंदीराचे बाजूला, भारतनगरझोपडपट्टी, कत्तारवाडी, विश्रांतवाडी, पुणे, ३) शिवम बजरंगी कश्यप, वय २२ वर्षे, रा. टिंगरे यांचेकडे भाडयाने, श्रीहंसनगर, धानोरी, पुणे ४) विशाल पप्पू कश्यप, वय २० वर्षे, रा. धानोरी, पुणे मुळ रा. कैथंग पुरवा, थाना भाधोका, जिल्हा रायबरेली, राज्य उत्तरप्रदेश** यांचे मदतीने केल्याचे कबुल केल्याने नमुद गुन्हयात वापरलेली पिकअप गाडी जप्त करण्यात आली आहे.

सदर आरोपी अटकेत असताना त्यांचेकडे विचारपुस केली असता आरोपीतांनी यापुर्वी दिनांक २२/१०/२०२४ रोजीचे लोणीकंद येथील जयवंत वेअर हाऊस मध्ये चोरी केल्याची कबुली दिल्याने व आरोपी अनिल गुप्ता याचे धानोरी येथील गोडावून मधून १) १०,९४,११७/- रू किंमतीचे कॉपर वायरचे एकुण ६२ बंडल कि. अं. २) ७००/- रू किंमतीच्या १ किलो वजनाच्या तांब्याच्या तारा कि. अं.असा एकुण १०,९४,८१७/- रू किंमतीचा माल जप्त करून लोणीकंद पोस्टे कडील गु र नं १००६/२०२४ भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ३०५, ३३४(१), ३३१(४) उघडकीस आणण्यात वाघोली पोलीसांना यश आले आहे.

वाघोली पोस्टे कडील गु.र.नं. १०२२/२०२४, भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ३०३(२), ३३४(२), ३(५) व लोणीकंद पोस्टे गु र नं १००६/२०२४ भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ३०५, ३३४(१), ३३१(४) उघडकीस आणून चार आरोपीतांना अटक करून १०,९४,८१७/- रू च्या कॉपर वायर व २,५०,०००/- रू ची पोर्टर ट्रान्सपोर्टेशन लॉजिस्टीकची पिकअप असा एकुण १३,४४,८१७/- रू.कि.चा मुद्देमाल जप्त केला.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग,श्री. मनोज पाटील, मा. पोलीस उपआयुक्त परिमंडळ ४, श्री. हिम्मत जाधव मा.सहा.पोलीस आयुक्त श्रीमती प्रांजली सोनवणे, येरवडा विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाघोली पोलीस ठाणे श्री पंडीत रेजितवाड, गुन्हे शोध पथकाचे सपोनि शिरीष भालेराव, पोलीस अंमलदार प्रशांत कर्णवर, दिपक कोकरे, प्रितम वाघ, विशाल गायकवाड यांनी केली आहे.

